वर्ष- १२ | अंक- ४४ | मुंबई, मंगळवार,१५ सप्टेंबर २०२६ ते २१ सप्टेंबर २०२६ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

मूल्य २/- रुपये

पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG|2

मऊ आणि फुललेली पोळी बनवायची जाणून घ्या योग्य पध्दत

3 → कर्जमाफीतील भेदभाव कशासाठी ?

गणपती मंडळांना महाप्रसाद ठेवायचा असेल ह्यहेह्न करावाच लगेच तुकाराम मुंडेंच्या ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

ठाणे मनपाचा शिपाई एसीबीच्या जाळ्यात

मालमत्ता कराच्या नावबदलासाठी तीन हजारांची लाच मागितली

ठाणे । मालमत्ता कराच्या पावतीवरील नावात बदल करण्यासाठी आवश्यक प्रमाणपत्र देण्याच्या मोबदल्यात तीन हजार रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी ठाणे महानगरपालिकेच्या मालमत्ता कर वसुली विभागातील शिपायाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) सोमवारी सापळा रचून ताब्यात घेतले. देवेंद्र द्वारकानाथ कोळी (४३) असे ताब्यात घेतलेल्या लोकसेवकाचे नाव आहे.

तक्रारदार यांनी भागीदारीतील ह्यपायोनिअर इन्व्हेस्टमेंट ॲन्ड ट्रेड मॅनेजमेंटह्न या कंपनीसाठी कार्यालय भाड्याने घेतले आहे. या कार्यालयाच्या मालमत्ता कर पावतीवरील नावात बदल करण्यासाठी प्रमाणपत्र मिळावे, यासाठी त्यांनी ठाणे महापालिकेच्या वागळे प्रभाग समितीतील मालमत्ता कर वसुली विभागाशी संपर्क साधला होता.



सांकेतिक फोटो

ही कारवाई पोलीस उपअधीक्षक भारत एकनाथ जाधव यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. पोहवा सुनील पवार, मपोहवा जयश्री मातेरे आणि चापोहवा किशोर शिंदे यांचा पथकात समावेश होता. ठाणे परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक शिवराज पाटील, अपर पोलीस अधीक्षक सुहास शिंदे आणि अपर पोलीस अधीक्षक भागवत सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

या कामासाठी शासनाची दोन हजार रुपये शुल्क भरावे लागेल, असे कोळी यांनी तक्रारदारास सांगितले. मात्र, त्याव्यतिरिक्त स्वतःसाठी तीन हजार रुपयांची लाच मागितल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला. याबाबत तक्रारदाराने चार सप्टेंबर रोजी एसीबीकडे लेखी तक्रार दिली.

तक्रारीच्या अनुषंगाने सोमवारी सकाळी ११.५१ ते दुपारी १२.४८ या वेळेत तक्रारदार आणि कोळी यांच्यात झालेल्या संभाषणाची पडताळणी करण्यात आली. यावेळी तक्रारदाराने रक्कम कमी करण्याची विनंती केल्यानंतर कोळी यांनी अडीच हजार रुपये स्वीकारण्याची तयारी दर्शविल्याचे एसीबीच्या पडताळणीत निष्पन्न झाले.

त्यानंतर एसीबीच्या पथकाने सोमवारी दुपारी १.१९ ते २.०५ या वेळेत ठाणे महापालिकेच्या वागळे प्रभाग समितीच्या दुसऱ्या मजल्यावरील मालमत्ता कर वसुली विभागाच्या कार्यालयात सापळा रचला. तक्रारदाराकडून लाचेची रक्कम स्वीकारताना कोळी यांना लाचेच्या रकमेसह ताब्यात घेण्यात आले. दुपारी २.०२ वाजता त्यांना ताब्यात घेतल्याची माहिती एसीबीने दिली. या प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ मधील (२०१८ च्या सुधारणेनुसार) कलम ७ अंतर्गत वागळे इस्टेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

तुकाराम मुंढेंचा पुन्हा दणका

कल्याण न्यायालयातील कॅन्टीनवर अन्न व औषध प्रशासनाची कारवाई





कल्याण। कल्याण न्यायालयाच्या आवारातील कॅन्टीनमध्ये आढळलेल्या अस्वच्छतेच्या प्रकाराची अन्न व औषध प्रशासनाने गंभीर दखल घेतली आहे. स्वच्छतागृहाच्या टाकीवरच स्वयंपाकघर उभारून सिलेंडर ठेवण्यात आल्याचे, तसेच कॅन्टीनसमोरून सांडपाणी वाहत असल्याचे पाहणीत आढळून आले. या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाने संबंधित उपाहारगृह बंद केले. कॅन्टीनमध्ये खाद्यपदार्थांवर माशा घोंघावत असल्याने तसेच धूळ आणि अस्वच्छ वातावरणात पदार्थ विकले जात असल्याची तक्रार कल्याण बार असोसिएशनने अन्न व औषध प्रशासनाकडे केली होती. त्यानंतर अधिकाऱ्यांनी केलेल्या पाहणीत स्वच्छतागृहाच्या टाकीवर स्वयंपाकाची व्यवस्था करण्यात आल्याचे आढळले. परिसरात सांडपाणी साचल्याने दुर्गंधी आणि माशांचा त्रास होत असल्याचेही निदर्शनास आले.

दरम्यान, कॅन्टीन चालकाकडे आवश्यक परवानगी नसल्याचेही अन्न व औषध प्रशासनाच्या पाहणीत समोर आले. ठाणे जिल्हा न्यायालयीन चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटनेच्या माध्यमातून केवळ चहाची टपरी चालविण्यास परवानगी असताना त्याचा विस्तार करून उपाहारगृह सुरू करण्यात आल्याचा आरोप आहे. तक्रारीची दखल घेत अन्न व औषध प्रशासनाने कारवाई करत संबंधित उपाहारगृह बंद केले. त्यामुळे न्यायालयाच्या आवारातील कॅन्टीनच्या अस्वच्छ कारभारावर

डोंबिवली स्कायवॉकवर फेरीवाल्यांचा धिंगाणा



डोंबिवली । डोंबिवली पश्चिम रेल्वे स्थानकाच्या स्कायवॉकवर फेरीवाल्यांनी केलेल्या अतिक्रमणाविरोधात पालिका आणि पोलिसांनी संयुक्त कारवाई केली. मात्र, कारवाईदरम्यान फेरीवाल्यांचा माल खाली फेकला जात असल्याचा आरोप करत काही फेरीवाल्यांनी आक्रमक भूमिका घेतली. यावरून फेरीवाले आणि पालिका-पोलिसांमध्ये वाद निर्माण झाला. या वेळी महिला फेरीवाल्यांसह काही फेरीवाल्यांची पोलिसांशी झटापट झाल्याने स्कायवॉकवर सुमारे अर्धा तास गोंधळाचे वातावरण होते.

डोंबिवली पश्चिम रेल्वे स्थानकाच्या स्कायवॉकवर मोठ्या संख्येने फेरीवाले बसत असल्याने प्रवाशांना ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागत होता. स्कायवॉकवरील अतिक्रमणामुळे पादचाऱ्यांना मार्ग मिळत नसल्याच्या तक्रारीही करण्यात आल्या होत्या. या पार्श्वभूमीवर पालिका आणि पोलिसांच्या पथकाने संयुक्तपणे कारवाई सुरू केली.

कारवाईदरम्यान फेरीवाल्यांचे साहित्य हटविण्यात येत असताना काही माल खाली फेकला जात असल्याचा आरोप फेरीवाल्यांनी केला. त्यावरून त्यांनी कारवाईला विरोध करण्यास सुरुवात केली. वाद वाढत गेल्यानंतर काही महिला फेरीवाल्यांसह इतर फेरीवाल्यांची पोलिसांशी झटापट झाल्याचे समोर आले आहे. या घटनेचा व्हिडीओ समाजमाध्यमांवर प्रसारित झाल्याने हा प्रकार चर्चेत आला आहे.

दरम्यान, स्कायवॉकवर झालेल्या या गोंधळामुळे काही काळ प्रवाशांनाही त्रास सहन करावा लागला. अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईला विरोध करताना कायदा-सुव्यवस्था बिघडू नये, यासाठी पोलिसांना हस्तक्षेप करावा लागला.

स्कायवॉक हा मुख्यतः प्रवाशांच्या सुरक्षित आणि सुरळीत ये-जा करण्यासाठी असताना त्यावर होणारे अतिक्रमण हा गंभीर प्रश्न ठरत आहे. त्यामुळे फेरीवाल्यांवरील कारवाई सातत्याने राबविण्याबरोबरच, कारवाई करताना फेरीवाल्यांच्या मालमत्तेचे नुकसान होणार नाही याचीही दक्षता घेण्याची मागणी होत आहे. या घटनेप्रकरणी पोलीस आणि पालिका प्रशासनाकडून पुढील कारवाई काय केली जाते, याकडे लक्ष लागले आहे.

ब्रेकऐवजी एक्सिलरेटर दाबला; कारच्या धडकेत महिलेचा मृत्यू



ठाणे। कळवा येथील खारेगाव परिसरात चालकाचा पाय ब्रेकऐवजी एक्सिलरेटरवर पडल्याने भरधाव कारने तिघांना धडक दिली. या अपघातात शुभांगी पाटील (४५) या पादचारी महिलेचा मृत्यू झाला, तर दोघे जण जखमी झाले. याप्रकरणी कारचालक अभिषेक कदम (३१) याच्याविरोधात कळवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कदम हा कुर्ला येथे राहतो. रविवारी सकाळी तो खारेगाव येथील नातेवाईकाला भेटून कारने कुर्ल्याच्या दिशेने निघाला होता. त्यावेळी ब्रेकऐवजी एक्सिलरेटर दाबला गेल्याने कारचा वेग वाढला आणि चालकाचे नियंत्रण सुटून रस्त्यावरील तिघांना धडक बसली. या अपघातात शुभांगी पाटील यांचा गंभीर दुखापतीमुळे मृत्यू झाला. आयुष पाटील (२८) आणि मालाश्री पुजारी (३२) हे जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

तडीपारीचा आदेश झुगारून डोंबिवलीत वावर; दोन तडीपार गुंड पोलिसांच्या ताब्यात



डोंबिवली । तडीपारीचा आदेश असतानाही डोंबिवली परिसरात वावरणाऱ्या दोन तडीपार गुंडांना कल्याण गुन्हे शाखा आणि टिळकनगर पोलिसांनी स्वतंत्र कारवाईत ताब्यात घेतले. प्रतिक राजेंद्र पाटील (२४) आणि अजय अर्जुन कांबळे (२९) अशी ताब्यात घेण्यात आलेल्यांची नावे आहेत.

कल्याण गुन्हे शाखेचे पथक डोंबिवलीतील कचोरे परिसरात गस्त घालत असताना प्रतिक पाटील हा पोलिसांना पाहून पळून जाण्याचा प्रयत्न करू लागला. पोलिसांनी त्याचा पाठलाग करून त्याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान तो कोळसेवाडी पोलीस ठाण्याच्या अभिलेखावरील तडीपार गुंड असल्याचे निष्पन्न झाले. तडीपारीचा आदेश असतानाही शहरात प्रवेश करून वास्तव्य केल्याप्रकरणी प्रतिक पाटीलविरुद्ध टिळकनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, पत्रीपूल आणि नेतिवली परिसरातही तडीपारीचा आदेश भंग करणाऱ्या अजय अर्जुन कांबळे याच्याविरुद्ध पोलिसांनी स्वतंत्र कारवाई केली. दोन्ही कारवायांमुळे तडीपार गुंडांवर पोलिसांची करडी नजर असल्याचे स्पष्ट झाले आहे.

वयाच्या ऐंशीकडे वाटचाल करतानाही ज्ञानाची अखंड साधना; प्रा. प्रकाश पांगम यांच्या 'Mandala Workbook' पुस्तकाचे प्रकाशन

नाशिक : वयाच्या ऐंशीकडे वाटचाल सुरू असतानाही प्रचंड ऊर्जा, ज्ञानाची तळमळ आणि नवनिर्मितीची जिद्द कायम ठेवणारे आदरणीय प्रोफेसर प्रकाश पांगम सर यांच्या 'Mandala Workbook' या पुस्तकाचे प्रकाशन शिक्षक दिनाचे औचित्य साधून के. के. वाघ कॉलेज, नाशिक येथे उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले.

प्रोफेसर प्रकाश पांगम हे अनेकांसाठी प्रेरणास्थान असून, त्यांचे ज्ञान, अनुभव आणि सामाजिक बांधिलकी यामुळे ते विद्यार्थ्यांसह विविध क्षेत्रातील व्यक्तींसाठी मार्गदर्शक ठरले आहेत. त्यांच्या 'Mandala Workbook' या पुस्तकातून विद्यार्थ्यांना तसेच सर्व वयोगटातील वाचकांना शांतता, एकाग्रता आणि सर्जनशीलतेची नवी दिशा मिळण्यास निश्चितच मदत होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

शिक्षक दिनाच्या निमित्ताने झालेल्या या पुस्तक प्रकाशनामुळे अउछअढ परिवारात अभिमानाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले. प्रा. पांगम सरांची कार्यक्षमता, सतत काहीतरी नवीन करण्याची जिद्द आणि ज्ञानाची अखंड साधना यांचे उपस्थितांनी कौतुक केले.

सर तुम्ही आमच्यासाठी केवळ लेखक नाही, तर चालते-बोलते विद्यापीठ आहात, अशा शब्दांत त्यांच्या कायार्चा गौरव करण्यात आला.

प्रा. प्रकाश पांगम सरांना उदंड आयुष्य, निरोगी आरोग्य लाभावे आणि त्यांच्या हातून अशीच अनेक ज्ञानवर्धक व प्रेरणादायी पुस्तके निर्माण व्हावीत, अशा शुभेच्छांसह उपस्थितांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

मुंबई, ठाणे, नवी मुंबईत ठिकठिकाणी वाहतूककोंडी; भांडुप ते तुर्भे साडेतीन तास

मुंबई : गौरी-गणपतीसाठी कोकणात जाणाऱ्या कोकणवासियांना मुंबई बाहेर पडताना नाकीनऊ आले आहेत. मुंबई, ठाणे, नवी मुंबईत ठिकठिकाणी वाहतूक कोंडी झाली आहे. या तिन्ही शहरातून बाहेर पडण्यासाठी ४-४ तास लागत असल्याचे चित्र दिसत होते. भांडुप ते तुर्भे या एका तासाच्या प्रवासाला तब्बल साडे तीन तास लागले. यामुळे प्रवासी वैतागले आहेत. येत्या सोमवारी गणेशोत्सवाला सुरुवात होत आहे. आज शुक्रवारी रात्रीपासूनच कोकणात जाणाऱ्या भक्तांची गर्दी उसळली आहे. कोकण रेल्वेने विविध गाड्या सोडल्या तरीही प्रवाशांची संख्या वाढली आहे. त्यामुळे रेल्वेचे तिकीट न मिळालेल्या भाविकांनी रस्ते मागार्ने गावी जाण्यास सुरुवात केली आहे.

मुंबई, ठाणे, नवी मुंबईतून कोकणात मोफत एसटी गाड्या, लक्झरी बस सुटल्या आहेत. घराबाहेर पडलेल्या नागरिकांच्या वाहनांमुळे शुक्रवारी रात्री ठाणे आणि नवी मुंबईतील प्रमुख रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली. पूर्व द्रुतगती महामार्ग, मुंब्रा बाह्यवळण मार्ग, शिळफाटा तसेच ठाणे-बेलापूर मार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. त्यामुळे कामानिमित्ताने बाहेर पडलेल्या नागरिकांना वाहतूक कोंडीचा मोठा फटका बसला.

ठाणे जिल्ह्यात कोकणपट्ट्यातील नागरिक मोठ्याप्रमाणात वास्तव्य करतात. कोकणात जाणाऱ्या नागरिकांसाठी विविध पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी समूह पद्धतीने एसटीची नोंदणी केली आहे. या एसटी बसगाड्या शुक्रवारी कोकणाच्या दिशेने रवाना करण्यात आल्या. तसेच, अनेकजण त्यांच्या खासगी वाहनाने रायगड, रत्नागिरीच्या दिशेने निघाले होते.

भीषण अपघातात दोघांचा मृत्यू; अज्ञात वाहनाची दुचाकीला धडक; चालकाचा शोध सुरू

शहापूर : मुंबई-नाशिक महामार्गावर आसनगाव हद्दीत शुक्रवारी पहाटेच्या सुमारास भरधाव अज्ञात वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवरील दोघांचा जागीच मृत्यू झाला. पहाटे सुमारे तीन वाजण्याच्या सुमारास घडलेल्या या घटनेने परिसरात खळबळ उडाली. मेघराज वेखंडे (१९) आणि मदन वरकुटे (४४) अशी अपघातात मृत्यू झालेल्यांची नावे आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, दोघेही वासिंद येथून दुचाकीवरून मुंबई-नाशिक महामार्गाने शहापूरच्या दिशेने येत होते. आसनगाव हद्दीत आले असता त्यांच्या दुचाकीला भरधाव वेगाने जाणाऱ्या अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. धडक एवढी भीषण होती की, दुचाकीवरील दोघांचाही जागीच मृत्यू झाला.



दरम्यान, अपघातानंतर अज्ञात वाहनचालक वाहनासह घटनास्थळावरून पसार झाला. या वाहनाचा शोध घेण्याचे काम सुरू असून, याप्रकरणी शहापूर पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

गणेशोत्सवाच्या काळात घडलेल्या या भीषण अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, मृतांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

पोलीस बातमी पत्र

आक्रोश

२

मुंबई, मंगळवार,१५ सप्टेंबर २०२६ ते २१ सप्टेंबर २०२६

सखी

मऊ आणि फुललेली पोळी बनवायची जाणून घ्या योग्य पद्धत



पोळी हे एक असे खाद्य आहे जे जवळ जवळ सर्व भारतीयांच्या घरात बनवली जाते. पोळी खाल्याशिवाय लोकांचे पोट भरत नाही. अनेक घरी लंच आणि डिनरमध्ये पोळी खाल्ली जाते. पण अनेक लोकांचे म्हणणे असते की पोळी बनवणे सोप्पे नसते. लोक पोळी बनवण्याची कृती जाणतात आणि रोज पोळी बनवतात. पण त्यांची तक्रार असते की त्यांची पोळी फुलत नाही आणि मऊ देखील बनत नाही. अनेक वेळेस लोक भिजवलेली कणिक फ्रीजमध्ये ठेवतात. ज्यामुळे पोळी मऊ बनत नाही. म्हणून फ्रिजमध्ये ठेवलेल्या कणकेची मऊ आणि फ लेली पोळी कशी बनवावी जाणून घ्या.

फ्रीजमध्ये ठेवलेल्या कणकेची मऊ पोळी बनवायची टिप्स

जर मळलेली कणिक फ्रीजमध्ये ठेवली असेल तर, पोळी बनवण्यापूर्वी गोळा परत एकदा माळावा. याकरिता कोमट पाण्याचा उपयोग करावा, फ्रीजमध्ये ठेवलेल्या कणकेच्या गोळ्यावर एक लेयर तयार होते. या लेयरला काढण्यासाठी कणकेचा गोळा परत मळावा. गोळा माळताना थोडे थोडे पाणी लावावे. तसेच गोळ्यातून फ्रीजचा थंडावा गेल्यानंतर पोळी लाटावी. तसेच फ्रीजम

धून काढलेला गोळा परत मळायला वेळ नसेल तर पोळी बनवल्यावर ती गॅस मोठा करून शेकू नये. असे केल्याने पोळी पापडसारखी कडक होईल.

फ्रीजमधून कणिक बाहेर काढून लगेच पोळी बनवू नये. पहिले कणकेला रूम टेम्परेचर वर ठेवावे. फ्रीजमधून कणिक बाहेर काढून लगेच पोळी बनवल्यास तिची चव देखील बदलते. जास्त दिवस फ्रीजमध्ये ठेवलेल्या कणकेच्या गोळ्याची पोळी खाऊ नये. कारण ती नरम होत नाही आणि चव देखील चांगली लागत नाही. तसेच उन्हाळ्यात शिळा झालेला कणकेचा गोळा हा नुकसानदायक असतो. म्हणून फ्रीजमध्ये जास्त दिवस ठेवलेल्या कणकेच्या गोळ्याची पोळी खाऊ नये.

पांढरे केस 30 मिनिटात काळे होतील या १ नेचरल हेयर मास्कच्या मदतीने

कालांतराने केस पांढरे होणे ही सामान्य गोष्ट आहे, परंतु आजकाल लोकांचे केस लहान वयापासूनच पांढरे होण्यास सुरुवात झाली आहे. कमी वयात केस पांढरे होण्यामुळे अनेकदा तुमच्या आत्मविश्वासावरही परिणाम होतो. त्यामुळे केस पांढरे होण्याच्या समस्येपासून प्रत्येकाला दूर राहायचे असते.

जर तुम्हाला केस पांढरे होण्याच्या समस्येचा सामना करावा लागत असेल तर विविध रसायने असलेले केस रंग वापरण्याऐवजी नैसर्गिक उपायांचा अवलंब करणे चांगले.

जेव्हा तुम्ही तुमच्या केसांवर केमिकल युक्त गोष्टी वापरता तेव्हा तुमचे केस खूप खराब होऊ लागतात. अशा परिस्थितीत केसांमध्ये इतरही अनेक प्रकारच्या समस्या उद्भवू लागतात. जर तुम्हाला केसांचे पांढरे होणे कमी करायचे असेल तर घरीच एक प्रभावी हेअर पॅक बनवा. या हेअर पॅकच्या मदतीने केस नैसर्गिकरित्या काळे करता येतात. चला जाणून घेऊया केस पांढरे होण्याच्या समस्येपासून कशी सुटका मिळेल?

घरी तयार करा हिबिस्कस फ्लॉवर हेअर पॅक

आवश्यक साहित्य- वाळलेली जास्वंदाची फुले - अर्धा चमचा
दही - २ चमचे
कॉफी पावडर - २ मोठे चमचे
व्हिटॅमिन ई कॅप्सूल - २ मोठे चमचे
एलोवेरा जेल - १ मोठा चमचा

कृती- सर्व प्रथम वाळलेल्या जास्वंदाची फुले पूर्णपणे कुटून घ्या. यानंतर त्यात दही, कॉफी पावडर, व्हिटॅमिन ई कॅप्सूल, कोरफड जेल इत्यादी घटक मिसळा. यानंतर केसांचे दोन भाग करा आणि तयार केलेले हेअर मास्क मुळापासून टोकापर्यंत लावा.

यानंतर एक टॉवेल घेऊन गरम पाण्यात बुडवा आणि पिळून घ्या. आता ते डोक्यावर लावा आणि सुमारे ३० मिनिटे सोडा. नंतर केस पाण्याने धुवा. तुम्हाला हवे असल्यास तुम्ही सौम्य शॅम्पूच्या मदतीने तुमचे केस देखील स्वच्छ करू शकता. यामुळे नैसर्गिकरित्या केस काळे होण्यास मदत होते.

केस काळे करण्यासाठी तुम्ही या खास हेअर मास्कचा वापर करू शकता. तथापि लक्षात ठेवा की जर तुमचे केस खूप पांढरे होत असतील तर अशा परिस्थितीत एकदा डॉक्टरांचा सल्ला घ्या. यासोबतच तुमच्या आहार आणि जीवनशैलीकडेही लक्ष द्या.



घरी बनवलेल्या नारळाच्या क्रीमचा उपयोग, त्वचा होईल मऊ



वातावरण बदलत आहे, थंडीचे दिवस जावून आता उष्णता वाढायला लागेल. दिवसा पडणाऱ्या कडक उन्हामुळे अनेकांनी स्किन केयर लावणे देखील सुरु केले आहे. या वातावरणात त्वचेची काळजी घेणे महत्वाचे आहे. काळजी घेतली नाही तर भविष्यात समस्या निर्माण होऊ शकतात. त्वचेची काळजी घ्यायची असेल तर घरीच नारळाचे क्रीम कसे बनवावे शिकून घ्या.

साहित्य
१ कप नारळाचे तेल
१ चमचा नैसर्गिक एलोवेरा जेल
१ ते २ थेंब एसेंशियल ऑइल

कृती

नारळाचे क्रीम बनवण्यासाठी एका वाटीमध्ये वितळलेले नारळाचे तेल आणि ताजे एलोवेरा जेल घ्या. आता याला चांगल्याप्रकारे मिक्स करा. म्हणजे हे चांगले एकत्र होतील. मग यामध्ये काही थेंब एसेंशियल ऑइल टाका. तुम्हाला हवे असल्यास याकरिता लॅवेंडर, पेपरमिंट किंवा साइट्रस तेल निवडू शकतात. तसेच चांगल्या प्रकारे मिक्स करा. तुमचे नारळाचे क्रीम तयार आहे. कोरडी त्वचा असणाऱ्या लोकांसाठी हे क्रीम फायदेशीर असते. या क्रीमचा उपयोग केल्यास तुमची त्वचा मऊ राहिल. क्रीम बनवतांना साहित्याचे प्रमाण व्यवस्थित पहावे. कारण दहा दिवसांच्या वरती याचा उपयोग वर्ज्य असेल. तसेच पाहिले थोडीशी त्वचेला लावून पहा यासाठी की क्रीम तुम्हाला सूट होत आहे का.

एलोवेरा जेलमध्ये कधीही मिसळू नये या ३ गोष्टी



त्वचेसाठी फायद्याऐवजी नुकसानदायक

आपल्या त्वचेची काळजी घेण्यासाठी अनेक लोक कोरफड वापरतात. काही लोक एकट्या कोरफडीचा वापर करतात तर काही लोक अनेक गोष्टी मिसळून लावतात. पण आज आम्ही तुम्हाला अशा काही गोष्टींबद्दल सांगणार आहोत ज्या कोरफडीमध्ये मिसळल्याने त्वचेला फायदा होण्याऐवजी नुकसान होते. कोरफड आपल्या त्वचेसाठी आणि केसांसाठी खूप फायदेशीर मानली जाते, त्यात आढळणारे अँटीऑक्सिडेंट आणि अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म आपली त्वचा निरोगी ठेवतात. कोरफडमध्ये व्हिटॅमिन ए आणि व्हिटॅमिन ई देखील चांगल्या प्रमाणात आढळतात, ज्यामुळे तुमची त्वचा निरोगी राहण्यास मदत होते. आज आम्ही तुम्हाला अशा ३ गोष्टींबद्दल सांगणार आहोत ज्या कोरफडीमध्ये मिसळल्यास तुमच्या त्वचेसाठी खूप हानिकारक ठरू शकतात.

१. लिंबाचा रस

लिंबाचा रस मिसळून कोरफड जेल लावात असाल तर चुकूनही अशी चूक करू नये. लिंबूमध्ये अम्लीय गुणधर्म आढळतात, त्यामुळे ते आपल्या त्वचेला हानी पोहोचवू शकते. कोरफड आपली त्वचा चमकदार बनवण्याचे काम करते, तर लिंबूमध्ये उलट गुणधर्म असतात. त्यामुळे चुकूनही कोरफडीमध्ये लिंबू मिसळू नका. यामुळे तुम्हाला पुरळ उठणे, लालसरपणा आणि खाज सुटणे यासारख्या समस्या होऊ शकतात.

२. टूथपेस्ट

त्वचा स्वच्छ करण्यासाठी दात स्वच्छ करण्यासाठी काम करणारी टूथपेस्ट आपण कधीही वापरू नये. आजकाल आपण अशा अनेक उपायांबद्दल ऐकले असेल ज्यामध्ये टूथपेस्टच्या मदतीने त्वचा सुधारण्यासाठी प्रयोग केले जातात. जर तुम्ही एलोवेरा जेल मिसळून टूथपेस्ट लावली तर तुमच्या त्वचेला गंभीर नुकसान होऊ शकते. अशा उपायांचा अवलंब करण्यापूर्वी तुम्ही तज्ज्ञांचे मत नक्कीच घ्यावे.

३. बेकिंग सोडा

कपडे स्वच्छ करण्यासाठी बेकिंग सोडा मोठ्या प्रमाणात वापरला जातो. दातांचा पिवळेपणा दूर करण्यासाठी बेकिंग सोडा देखील वापरता येतो हे तुम्ही ऐकले असेल. परंतु बरेच लोक त्वचा सुधारण्यासाठी कोरफड जेलमध्ये बेकिंग सोडा मिसळण्याचा सल्ला देतात. जर तुम्ही तुमची त्वचा उजळ करण्यासाठी बेकिंग सोडा वापरणार असाल तर सावधान, असे केल्याने तुमच्या त्वचेला खूप नुकसान होऊ शकते.

चेहऱ्यावर कोणते सीरम कोणत्या वेळी लावावे, दिवस आणि रात्रीचे सीरम वेगळे आहेत का ते जाणून घ्या



सीरम हे हलके, पाण्यासारखे द्रव आहे जे त्वचेचे पोषण करण्यास आणि त्वचेच्या विविध समस्या दूर करण्यास मदत करते. त्यातील सक्रिय घटक त्वचेत खोलवर जातात आणि त्वचेच्या समस्यांवर प्रभावीपणे उपचार करतात.

पण तुम्हाला माहित आहे का की दिवसा आणि रात्री वेगवेगळ्या वेळी वेगवेगळ्या प्रकारचे सीरम लावावेत? कोणता सीरम कधी आणि का लावावा ते जाणून घेऊया.

दिवसा कोणता सीरम लावावा?

व्हिटॅमिन सी सीरम: सकाळी व्हिटॅमिन सी सीरम लावणे चांगले कारण ते त्वचेला अतिनील किरणांपासून संरक्षण करण्यास मदत करते आणि कोलेजन उत्पादनास प्रोत्साहन देते.

नियासीनामाइड सीरम: नियासीनामाइड सीरम सकाळी देखील लावता येते. ते त्वचेचा रंग समतोल करते आणि सूज कमी करते.

अँटिऑक्सिडंट सीरम: अँटिऑक्सिडंट सीरम सकाळी लावण्यासाठी देखील योग्य आहे कारण ते पर्यावरणीय प्रदूषणामुळे होणाऱ्या नुकसानापासून त्वचेचे संरक्षण करते.

रात्री कोणता सीरम लावावा?

रेटिनॉल सीरम: रात्रीच्या वेळी रेटिनॉल सीरम लावणे चांगले कारण सूर्यप्रकाशाच्या संपर्कात आल्यास ते त्वचा संवेदनशील बनवू शकते. हे कोलेजन उत्पादनास प्रोत्साहन देते आणि सुरकुत्या कमी करते.

हायल्यूरॉनिक ॲसिड सीरम: हायल्यूरॉनिक ॲसिड सीरम त्वचेला हायड्रेट करण्यास मदत करते आणि जेव्हा त्वचा दुरुस्ती आणि पुनरुत्पादनाच्या प्रक्रियेत असते तेव्हा रात्रीच्या वेळी लावणे चांगले.

पेप्टाइड सीरम: पेप्टाइड सीरम रात्री देखील लावता येते कारण ते त्वचा मजबूत करते आणि सुरकुत्या कमी करते.

सीरम लावण्याची योग्य पद्धत

चेहरा स्वच्छ करा: सीरम लावण्यापूर्वी चेहरा पूर्णपणे स्वच्छ करा.

टोनर वापरा: टोनर वापरल्याने त्वचेची पीएच पातळी संतुलित राहते.

सीरम लावा: सीरमचे काही थेंब घ्या आणि चेहऱ्यावर हलक्या हाताने मसाज करा.

मॉइश्चरायझर लावा: सीरम लावल्यानंतर मॉइश्चरायझर वापरा.

सीरम तुमच्या त्वचेसाठी एक उत्तम उत्पादन असू शकते, परंतु ते योग्यरित्या वापरणे महत्वाचे आहे. वेगवेगळे सीरम त्यांच्या नियुक्त वेळी लावावेत. जर तुम्ही तुमच्या त्वचेसाठी योग्य सीरम निवडला आणि ते योग्यरित्या वापरले तर तुम्हाला नक्कीच निकाल आवडतील.

अस्वीकरण:

या लेखांमध्ये दिलेली माहिती आणि उपाय सामान्य माहितीवर आधारित आहे. या माहितीची पूर्णता, विश्वासार्हता आणि अचूकता याबाबत दैनिक 'मुंबई लक्षदीप' कोणतीही हमी देत नाही. अधिक माहितीसाठी संबंधित तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

पोलीस बातमी पत्र

महामुंबई

३

मुंबई, मंगळवार, १५ सप्टेंबर २०२६ ते २१ सप्टेंबर २०२६

संपादकीय

कर्जमाफीतील भेदभाव कशासाठी ?



संपादक दिपक मोरेश्वर नाईक



बड्या उद्योजकांनी कर्जमाफीसाठी आंदोलन केल्याचे, उपोषण केल्याचे ऐकिवात नाही. तरीही त्यांना अगदी सुलभपणे कर्जमाफी उर्फ ह्यहेअर कटह्णचा लाभ होतो. बड्या उद्योजकांवर मुक्तहस्ते पैशांची उधळण करणारा हा भेदभाव संपला पाहिजे.

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर झाल्यावर कर्जमाफीचा दुसरा हप्ता सरकारने वितरित केला तेव्हा एकूण १२,५८,२४३ पात्र शेतकऱ्यांना रु.१०,११५ कोटींच्या कर्जमुक्तीचा लाभ झाला. त्याच सुमारास आलेल्या एका बातमीनुसार, झी मीडियाचे संस्थापक आणि एस्सेल ग्रूपचे चेअरमन सुभाष चंद्र यांची रु.२२,००० कोटी देयके असताना केवळ रु.६.५ कोटी वसूल करण्यास नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनलने (एनसीएलटी) मान्यता दिली. म्हणजे सुभाष चंद्र या फक्त एक व्यक्तीने साडेबारा लाखांहून अधिक शेतकऱ्यांना दिलेल्या एकूण कर्जमाफीच्या दुपटीहून अधिक रकमेची कर्जमाफी मिळवली आहे आणि त्यास हेअर कट असे गोंडस नाव दिले आहे. शेतकऱ्यांची कर्जमाफी असो किंवा उद्योजकांची, दोन्हींचा परिणाम एकच. बँका, वित्तीय संस्था, सरकारला, पर्यायाने जनतेला तेवढ्या रकमेचा भुर्दंड. परंतु सामाजिक, राजकीय आणि आर्थिक आघाड्यांवर मात्र या कर्जमाफीबाबत जी भेदभावपूर्ण वृत्ती दिसते, त्यावर एक दृष्टिक्षेप टाकणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांचे आणि उद्योजकांचे कर्जमाफीचे आकडे

दोन-अडीच वर्षांपूर्वी याच एनसीएलटीने अनिल अंबानी समूहाच्या एका कंपनीची देयता रु.४७,२५१ कोटी असताना केवळ रु.४५५.९ कोटी रुपयांवर मुक्तता केली आणि बँका/वित्तीय संस्थांना रु.४६७९५ कोटी रुपयांवर पाणी सोडावे लागले. त्याही आधी हजारो कोटींची कर्जे न फेडता परदेशात पळून गेलेल्या बड्या कर्जदारांची, खरे तर आर्थिक गुन्हेगारांची एकूण रक्कम अंदाजे रु.५८,००० कोटी आहे. एका वृत्तानुसार गेल्या ११ वर्षांत रु.१६.३५ लाख कोटी रुपयांची कॉर्पोरेट कर्जे निर्लेखित करण्यात आली, तर त्याच काळात विविध राज्यांमध्ये शेतकऱ्यांना मिळालेली एकत्रित कर्जमाफीची रक्कम आहे फक्त रु.१.८८ लाख कोटी . म्हणजे निर्लेखित केलेली कॉर्पोरेट कर्जे शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जमाफीच्या साडेआठ पट अधिक आहेत. यावर कळस म्हणजे, केंद्रीय प्रत्यक्ष कर बोर्डाच्या रिपोर्टनुसार मोठ्या उद्योजकांना गेल्या पाच वर्षांत रु.४.५३ लाख कोटी रुपयांची कर सवलत देखील देण्यात आली आहे. केवढे हे बड्या उद्योजकांचे लाड ! तेही जनतेच्या पैशांतून.

कर्जमाफीची मयार्दा

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना जी कर्जमाफी दिलेली आहे त्यामध्ये दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जे माफ करण्यात आली आहेत. त्यावरील रकमेची कर्जे असल्यास दोन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज वन टाइम सेटलमेंट (ओटीएस)मार्फत माफ केले जाईल. बड्या उद्योजकांना मात्र अशी काही मयार्दा ठेवलेली दिसत नाही.

मध्यमवर्गीय, अर्थशास्त्रज्ञ यांचा दुटप्पी दृष्टिकोन

बँका स्वतः होऊन शेतकऱ्यांना कर्जमाफी देत नाहीत, सरकार देते. कर्जमाफीची रक्कम सरकार बँकांकडे वर्ग करते. शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली की मध्यमवर्गीय पांढरपेशे लोक, अर्थशास्त्रज्ञ इत्यादींना या कर्जमाफीचे भयावह दुष्परिणाम दिसू लागतात. आता अर्थव्यवस्थेला धोका निर्माण होणार, सरकारचे कर्ज वाढणार, बँकिंग व्यवस्थेचे नुकसान होणार, ऋण-शिस्त बिघडणार, लोकांची कर्जफेडीबाबतची नियत खराब होणार, खूप झाले शेतकऱ्यांचे लाड.., अशा प्रतिक्रिया येऊ लागतात. परंतु शेतकऱ्यांच्या कर्जमाफीपेक्षा साडेआठपट रकमेच्या, बड्या उद्योजकांच्या निर्लेखित कर्जांबाबत मात्र अर्थशास्त्रज्ञ आणि शेतकरी-कर्जमाफीचे टीकाकार तोंडात मिठाची गुळणी घेऊन असतात. निर्लेखित करणे म्हणजे कर्जमाफी नव्हे, औद्योगिक क्षेत्र वाचविण्यासाठी आणि बँकांचे ताळेबंद स्वच्छ ठेवण्यासाठी हेअर कट आवश्यक असतो, अशी मखलाशी बड्या कर्जांबाबत केली जाते. पण निर्लेखित केलेल्या कर्जांपैकी किती वसूल झाले याची आकडेवारी काही पुढे येत नाही.

कर्जमाफीची कारणे

शेतकरी उठसूठ कर्जमाफी मागत नाहीत. दुष्काळ, अतिवृष्टी, चक्रीवादळे इत्यादी नैसर्गिक आपत्तींमुळे पिके उद्ध्वस्त होतात, तेव्हाच कर्जमाफीची मागणी होते. बड्या उद्योजकांच्या कर्जमाफीची किंवा हेअर कटची कारणे मात्र सहसा प्रकाशात येत नाहीत. सवलतीच्या दरातले कर्ज आणि भांडवलाच्या स्वरूपात उपलब्ध असलेला प्रचंड पैसा, आर्थिक, तांत्रिक, व्यवस्थापन क्षेत्रातील विशेषज्ञांची तसेच कुशल-अकुशल प्रशिक्षित कामगारांची फौज, मुबलक पाणी आणि वीजपुरवठा, करसवलती हे सारे उद्योजकाच्या दिमतीला असताना एखादा उद्योग गाळात जातोच कसा? या प्रश्नाचा वेध घेऊन त्याची कारणे जनतेसमोर आणल्याचे दिसत नाही. त्यांना दिलेला पैसा कोठे गेला त्याचा शोधही घेतला जात नाही. हेअर कट, ओटीएस, कॉम्प्रोमाइजच्या नावाने वर्षानुवर्षे त्यांना कर्जमाफी दिली जात आहे.

कजार्साठी तारण आणि कजार्ची वसुली

शेतकऱ्यांची जमीन कजार्साठी तारण म्हणून घेतली जाते. सातबाराच्या उताऱ्यावर हे कर्ज चढले की पुन्हा कर्ज मिळणे अवघड होते. मात्र बड्या उद्योजकांना जेव्हा मोठ्या रकमेची कर्जमाफी दिली जाते, तेव्हा प्रश्न पडतो की यांच्याकडून कर्ज रकमेएवढे काही तारण घेतले नव्हते का? त्या तारणातून त्यांची कर्जवसुली का होऊ शकली नाही? हे प्रश्न अर्थशास्त्रज्ञ, राजकारणी किंवा पांढरपेशा लोकांना पडत नाहीत. हेअर कट, ओटीएस झाल्यावर बडा कर्जदार कर्जमुक्त होतो आणि पुन्हा दुसरे कर्ज घेण्यासाठी पात्र ठरतो.

कर्ज फेडू न शकणाऱ्या शेतकऱ्यांची आणि उद्योजकांची स्थिती नैसर्गिक आपत्तीमुळे कर्ज फेडू न शकणाऱ्या शेतकऱ्यांची घरची स्थिती दयनीय असते. मुलांचे शिक्षण, दैनंदिन जीवन यात त्याचा कर्जबाजारीपणा प्रतिबिंबीत झालेला दिसतो. या तणावामुळे काही शेतकरी आत्महत्या करतात. याउलट बड्या कर्जदारांचा आलिशान बंगला, महागड्या गाड्या, त्यांचा आणि त्यांच्या कुटुंबीयांचा रुबाब यावर कर्जबाजारीपणाचा काहीही परिणाम झालेला दिसत नाही. हे बडे उद्योजक जुनाट, ठिगळ लावलेले कपडे घालून, रिक्षाने बँकेत येताना कधीही दिसत नाहीत. कर्जबाजारीपणामुळे त्यांची मुले जिल्हा परिषद शाळेत जाताना दिसत नाहीत. कारण त्यांची कर्जे कंपनीच्या नावे असतात, कंपनीकडून मिळणारे लाभ ते ओरपतात आणि कर्ज फेडायची वेळ आली की कंपनीला दिलेले कर्ज कंपनीकडून वसूल करायला सांगून स्वतः नामानिराळे राहतात. शेतकऱ्यांचा सातबारा कजार्ची माहिती जाहीरपणे दाखवतो, परंतु कर्जबुडव्या बड्या उद्याजकांचे नाव देखील गुप्ततेच्या बहाण्याने जाहीर केले जात नाही.

बड्या उद्योजकांपेक्षा छोटे कर्जदार अधिक इमानदार

माहिती अधिकारात मिळवलेल्या आणि जाहीर झालेल्या सेंट्रल बँकेच्या आकडेवारीनुसार गेल्या दहा वर्षांत, प्रत्येकी १०० कोटींपेक्षा अधिक कर्ज घेतलेल्या बड्या कर्जदारांच्या एकूण रु.२६,७०१.५५ कोटी निर्लेखित कर्जांपैकी फक्त रु.३,८७४.४१ कोटी म्हणजे १४.५% वसूल झाले. याच कालावधीत प्रत्येकी रु.१ कोटीपेक्षा कमी कर्ज घेतलेल्या छोट्या कर्जदारांच्या एकूण रु.६,७७४.२३ कोटी निर्लेखित कर्जांपैकी रु.५,००४.२८ कोटी म्हणजे ७४% वसूल झाले. अन्य बँकांमध्ये सुद्धा अशीच स्थिती असावी. यावरून असे म्हणता येते की छोटे कर्जदार बड्या कर्जदारांपेक्षा अधिक इमानदार असतात. असेही म्हणता येईल की बँका मोठ्या कर्जदारांना छोट्या कर्जदारांपेक्षा अधिक झुकते माप देतात.

हा भेदभाव का?

आपल्या कृषिप्रधान देशातला शेतकरी हा देशाला अन्न पुरवणारा अर्थव्यवस्थेतील महत्त्वाचा घटक आहे. उद्योजक देखील महत्त्वाचे घटक आहेत हे मान्य. परंतु कर्ज देण्यापासून वसूल करण्यापर्यंत, तसेच कर्जमाफीच्या वेळीही शेतकऱ्यांबाबत दुजाभाव का केला जातो, हे न उलगडलेले कोडे आहे. काही वर्षांपूर्वी शेतकऱ्यांना घातक असे कृषी कायदे रद्द करण्यासाठी मोठे आंदोलन करावे लागले होते. नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीनंतर कर्जमाफीसाठी त्यांना आंदोलन करावे लागते. परंतु बड्या उद्योजकांनी कर्जमाफीसाठी आंदोलन केल्याचे, उपोषण केल्याचे ऐकिवात नाही. तरीही त्यांना अगदी सुलभपणे कर्जमाफी उर्फ हेअर कटचा लाभ होतो. बड्या उद्योजकांवर मुक्तहस्ते पैशांची उधळण करणारा हा भेदभाव संपला पाहिजे. त्यासाठी कर्जमाफीची प्रक्रिया पारदर्शक करणे अत्यंत आवश्यक आहे.

Date : 15.09.2026

PUBLIC NOTICE

Notice is hereby given that MR. DEEPAK MORESHWAR NAIK was the owner of Shop No. 5, Ground Floor, A wing, DEV SHRUSHTI CO-OP. HSG. SOC. LTD., 60FT Road, Bhayandar (West), Tal & Dist-Thane-401 101. M/S. SDC DEVELOPERS PRIVATE LIMITED had sold the Shop to MR. DEEPAK MORESHWAR NAIK by Agreement for Sale dated 31.12.2001. MR. DEEPAK MORESHWAR NAIK expired on 30.12.2025. After the death of the above said deceased he has left behind 1. SMT. PREETI DEEPAK NAIK (Wife) 2. MS. TEJASVI DEEPAK NAIK (Daughter) 3. MS. ASHWINI DEEPAK NAIK (Daughter) 4. MR. GURUPRASAD DEEPAK NAIK (Son) as the only legal surviving legal heirs. 1. MS. TEJASVI DEEPAK NAIK (Daughter) 2. MS. ASHWINI DEEPAK NAIK (Daughter) have agreed to release their rights, title, interest, share in the said shop to their Mother SMT. PREETI DEEPAK NAIK and Brother MR. GURUPRASAD DEEPAK NAIK. They have made application for membership to the Society to transfer the said Shop in the name of SMT. PREETI DEEPAK NAIK and MR. GURUPRASAD DEEPAK NAIK . If any person has any objection over transfer of the above said Shop or regarding legal heirs in respect of the above property through claim of sale, transfer, heirship, mortgage, lease, title, interest etc. then such person should raise her/his/their claims or objection through written documents along with proofs thereof to undersigned within 14 days from the date of publication of this advertisement/notice. After 14 days no claim shall be considered and the same shall be transferred in the name of SMT. PREETI DEEPAK NAIK and MR. GURUPRASAD DEEPAK NAIK as the joint owners of the Shop premises and it shall be assumed that the title of the said Shop premises is clear and marketable.

R.L. Mishra
Advocate, High Court, Mumbai
Off. No. 23, 1st Floor, Sunshine Height,
Near Railway Station, Nallasopara (E),
Dist-Palghar-401 209.

Date : 15.09.2026

PUBLIC NOTICE

Notice is hereby given that MR. DEEPAK MORESHWAR NAIK was the owner of Shop No. 22, Ground Floor, GOLDEN NEST-VI SONAM SHOPPING CENTER CO-OP. HSG. SOC. LTD., Next to Balaji Hospital, Mira Bhayandar Road, Bhayandar (East), Tal & Dist-Thane-401 105. M/S. SONAM BUILDERS had sold the Shop to MR. DEEPAK MORESHWAR NAIK by Agreement for Sale dated 19.01.2006. MR. DEEPAK MORESHWAR NAIK expired on 30.12.2025. After the death of the above said deceased he has left behind 1. SMT. PREETI DEEPAK NAIK (Wife) 2. MS. TEJASVI DEEPAK NAIK (Daughter) 3. MS. ASHWINI DEEPAK NAIK (Daughter) 4. MR. GURUPRASAD DEEPAK NAIK (Son) as the only legal surviving legal heirs. 1. MS. TEJASVI DEEPAK NAIK (Daughter) 2. MS. ASHWINI DEEPAK NAIK (Daughter) have agreed to release their rights, title, interest, share in the said shop to their Mother SMT. PREETI DEEPAK NAIK and Brother MR. GURUPRASAD DEEPAK NAIK. They have made application for membership to the Society to transfer the said Shop in the name of SMT. PREETI DEEPAK NAIK and MR. GURUPRASAD DEEPAK NAIK . If any person has any objection over transfer of the above said Shop or regarding legal heirs in respect of the above property through claim of sale, transfer, heirship, mortgage, lease, title, interest etc. then such person should raise her/his/their claims or objection through written documents along with proofs thereof to undersigned within 14 days from the date of publication of this advertisement/notice. After 14 days no claim shall be considered and the same shall be transferred in the name of SMT. PREETI DEEPAK NAIK and MR. GURUPRASAD DEEPAK NAIK as the joint owners of the Shop premises and it shall be assumed that the title of the said Shop premises is clear and marketable.

R.L. Mishra
Advocate, High Court, Mumbai
Off. No. 23, 1st Floor, Sunshine Height,
Near Railway Station, Nallasopara (E),
Dist-Palghar-401 209.

पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई. मंगळवार,१५ सप्टेंबर २०२६ ते २१ सप्टेंबर २०२६

गणपती मंडळांना महाप्रसाद ठेवायचा असेल 'हे' करावाच लगेच तुकाराम मुंडेंच्या एफडीएचा आदेश



गणेशोत्सवादरम्यान ज्या मंडळांना महाप्रसादाचे आयोजन करायचे असेल अशा मंडळांसाठी आता ऋऊअ ने नवीन आदेश काढले आहेत. मंडळांना 'एफडीए'कडे ऑनलाइन नोंदणी करावी लागणार असून त्यानंतर मंडळांना पाच वर्षांची परवानगी दिली जाणार आहे.

मुंबई । सध्या सर्वत्र गणेशोत्सवाच्या तयारीची लगबग सुरु आहे. गणेशोत्सवाला आता अवघे काही दिवस शिल्लक शिल्लक असताना आता एफडीए'ने मंडळांना महाप्रसादासाठी नोंदणीची सक्ती केली आहे. यामध्ये मंडळांना आधार कार्ड, रजिस्ट्रेशन नंबर, पॅन कार्ड आणि शंभर रुपये शुल्क भरून 'एफडीए'कडे ऑनलाइन नोंदणी करावी लागणार आहे. यानुसार मंडळांना पाच वर्षांची परवानगी दिली जाणार आहे. मात्र ऐन गणेशोत्सवाच्या तोंडावर 'एफडीए' ने नवा आदेश काढल्याने सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसमोर मोठा पेच निर्माण झाला आहे. हॉटेल्स आणि रेस्टॉरंटसाठी असणारी नियमावली महाप्रसादासाठी लागू : तुकाराम मुंढे आयुक्त असलेल्या 'एफडीए'ने अन्न सुरक्षेचे कारण देत हॉटेल्स आणि रेस्टॉरंटसाठी असणारी नियमावली महाप्रसादासाठी लागू राहणार असल्याचे जाहीर केले आहे. यामध्ये अन्न सुरक्षा कायद्यानुसार 'फुड बिझनेस ऑपरेटर' असलेल्या प्रत्येकाकडे नोंदणीकृत परवाना असणे अनिवार्य केले आहे. मात्र हा नियम छोट्या मंडळांसाठी अडचणीचा ठरणार आहे. आर्थिक स्थितीमुळे या मंडळांना परवानाधारक कॅटरर्स नेमणे अशक्य आहे. त्यामुळे याबाबत नियमामध्ये शिथिलता द्यावी, अशी मागणी गणेशोत्सव समन्वय समितीकडून करण्यात आली होती. मात्र गणेशोत्सव समिती आणि एफडीएच्या आजच्या बैठकीत मंडळांना महाप्रसादासाठी नोंदणी बंधनकारक करण्यात आली. बीकेसी येथे गणेशोत्सव समिती आणि एफडीएमध्ये झालेल्या बैठकीप्रसंगी कार्याध्यक्ष कुंदन आगसकर, प्रमुख कार्यवाह गिरीश वालावलकर, उपाध्यक्ष सतीश नाईक, सहकार्यवाह संजय शिर्के, सिद्धेश खानविलकर उपस्थित होते. गणेशोत्सव समन्वय समितीचं काय म्हणणं? राहिल्यामुळे नोंदणीची प्रक्रिया करणे मंडळांना जिकिरीचे ठरणार आहे. त्यामुळे नोंदणीच्या नियमाची अंमलबजावणी पुढील वर्षीपासून करा, अशी मागणी गणेशोत्सव समन्वय समितीचे अध्यक्ष नरेश दहीबावकर यांनी केली आहे. एफडीएचे नियम पाळण्यासाठी मंडळे सकारात्मक आहेत. मात्र अचानक नोंदणीची सक्ती करू नये, असे ते म्हणाले.

ठाण्यात शाळा, रुग्णालये आणि धार्मिक स्थळांजवळील अनधिकृत पानटपऱ्यांवर महापालिकेचा हातोडा



ठाणे। शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, धार्मिक स्थळे आणि इतर सार्वजनिक ठिकाणांच्या परिसरातील अनधिकृत पानटपऱ्या, हातगाड्या, चिकन-मटण दुकाने, चायनीज स्टॉल्स आणि तत्सम अतिक्रमणांविरोधात ठाणे महानगरपालिकेने विशेष मोहीम सुरू केली आहे. मोहिमेच्या पहिल्याच दिवशी वर्तकनगर आणि मुंब्रा प्रभाग समिती क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर कारवाई करत अनेक अनधिकृत अतिक्रमणे हटविण्यात आली. महापौर शर्मिला पिंपळोलकर आणि महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या निर्देशानुसार अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात येत आहे. सोमवारी झालेल्या सर्वसाधारण सभेत नगरसेविका परिषा सरनाईक यांनी सार्वजनिक ठिकाणांच्या परिसरात वाढलेल्या अनधिकृत अतिक्रमणांचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यानंतर आयुक्तांनी तातडीने कारवाईचे आश्वासन दिले होते. या मोहिमेअंतर्गत मुंब्रा प्रभाग समिती क्षेत्रात ११ अनधिकृत पानटपऱ्या, ८ हातगाड्या आणि ४ स्टील बाकडे हटविण्यात आले. तर वर्तकनगर प्रभाग समिती क्षेत्रात १० अनधिकृत पानटपऱ्यांवर कारवाई करून परिसर अतिक्रमणमुक्त करण्यात आला. शाळा, महाविद्यालये, रुग्णालये आणि धार्मिक स्थळांच्या परिसरातील सुरक्षितता वाढविणे, वाहतुकीतील अडथळे दूर करणे, पादचारी मार्ग मोकळे ठेवणे तसेच स्वच्छता आणि सार्वजनिक सुव्यवस्था कायम राखणे, हा या विशेष मोहिमेचा प्रमुख उद्देश असल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले.

महापालिकेने ही कारवाई केवळ दोन प्रभाग समित्यांपुरती मर्यादित न ठेवता शहरातील सर्व प्रभाग समिती क्षेत्रांमध्ये टप्प्याटप्प्याने राबविण्याचा निर्णय घेतला आहे. अनधिकृत अतिक्रमणांविरोधातील मोहीम सातत्याने सुरू राहणार असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमासह इतर संबंधित कायद्यांनुसार कठोर प्रशासकीय आणि कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे. उपआयुक्त (अतिक्रमण) जितेंद्र निकम यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम राबविण्यात येत असून परिमंडळ ३ चे उपआयुक्त दिनेश तायडे, परिमंडळ १ चे उपआयुक्त दीपक झिंजाड, वर्तकनगर प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त गणेश चौधरी आणि मुंब्रा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त विजय कवळे यांच्या समन्वयातून कारवाई करण्यात आली. अतिक्रमण विभाग, प्रभाग समितीचे अधिकारी-कर्मचारी, पोलीस प्रशासन आणि संबंधित विभागांच्या संयुक्त पथकाने ही मोहीम यशस्वीपणे पार पाडली. महापालिकेने नागरिकांना विनापरवानगी अतिक्रमणे उभारू नयेत तसेच शहर स्वच्छ, सुरक्षित आणि अतिक्रमणमुक्त ठेवण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

डोंबिवलीहून सुटलेल्या गर्दीच्या लोकल ट्रेनमधून महिला थेट ट्रॅकवर पडली

ठाणे। डोंबिवली स्थानकातून सकाळी ७:५६ वाजता सुटलेल्या तुफान गर्दीच्या लोकल ट्रेनमधून एक महिला प्रवासी अचानक रेल्वे रुळावर पडल्याची धक्कादायक घटना घडली आहे. सुदैवाने या घटनेत महिलेला केवळ किरकोळ दुखापत झाली असून मोठी दुर्घटना टळली आहे.

दिवा ते मुंब्रा दरम्यान घडली घटना ही घटना दिवा आणि मुंब्रा स्थानकांच्या दरम्यान घडली. सकाळी ७:५६ ची लोकल असल्याने ट्रेनमध्ये प्रवाशांची प्रचंड गर्दी होती. सिग्नल मिळाल्यामुळे गाडी काही वेळासाठी थांबली असता, गर्दीच्या दबावामुळे आणि तोल गेल्याने ही महिला थेट रेल्वे रुळावर खाली पडली.

प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण

महिला रुळावर पडल्याचे दिसताच ट्रेनमधील आणि आसपासच्या प्रवाशांमध्ये एकाच वेळी प्रचंड घबराट पसरली. मात्र, प्रसंगावधान राखून इतर प्रवाशांनी लगेचच मदतीसाठी पुढाकार घेतला. महिला सुखरूप असल्याचे आणि तिला फक्त किरकोळ दुखापत झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर सर्वांनी सुटकेचा विश्वास सोडला.



लोकलमधील गदीर्चा प्रश्न पुन्हा ऐरणीवर मध्य रेल्वेवर सकाळी पीक अव्हर्समध्ये ट्रेनमधील प्रचंड गदीमुंळे प्रवाशांचा जीव धोक्यात येत असल्याचे या घटनेवरून पुन्हा एकदा समोर आले आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आणि गदीर्चे नियोजन करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी आता पुन्हा जोर धरू लागली आहे.

17 वर्षाच्या मुलावर लैंगिक अत्याचार

पुण्यात एका 21 वर्षीय तरुणीवर लैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल झाला आहे. 17 वर्षाच्या मुलावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप या तरुणीवर आहे. कॅफेमध्ये नेऊन या तरुणीने अत्याचार केल्याचे तक्रारीत म्हंटले आहे.

पुणे। पुण्यात एक अत्यंत धक्कादायक प्रकार उघकीस आला आहे. एका तरुणीचा प्रताप पाहून पोलिसही अचंबित झाले आहे. एका 21 वर्षीय तरुणीवर लैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल झाला आहे. 17 वर्षाच्या मुलावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप या तरुणीवर करण्यात आला आहे. कॅफेमध्ये नेऊन या तरुणीने 17 वर्षाच्या मुलावर अत्याचार केल्याची माहिती समोर आली आहे.

अत्याचाराचा कथित गुन्हा दाखल झालेली तरुणी पुण्यातील ताडीवाला रोड परिसरात राहते. या 21 वर्षीय तरुणीवर तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. 17 वर्षीय मुलावर कथित लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, संबंधित तरुणीने 17 वर्षीय मुलाशी लग्न करण्याचे आश्वासन दिले होते.

संबधीत तरुणी मुलाच्या घरी गेली होती आणि त्याच्याशी लग्न करण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यानंतर ती त्याला तळेगावमधील एका कॅफेमध्ये घेऊन गेली. याच ठिकाणी कथित लैंगिक अत्याचाराची घटना घडल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. मुलाच्या वडिलांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे,

दोघेही नातेवाईक असून गेल्या काही महिन्यांपासून एकमेकांच्या संपर्कात होते, अशी माहिती आहे. या प्रकरणी पोलिसांनी बाल संरक्षण कायद्यासह संबंधित कायदेशीर कलमांनुसार गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

सांगलीत 3 विद्यार्थीनींवर अत्याचार

सांगलीच्या वाळवा तालुक्यात 3 विद्यार्थीनींवर अत्याचार झाला आहे. गोटखिंडीतील केतनराज स्पर्धा परीक्षा अकॅडमीच्या निवासी शाळेत हा धक्कादायक प्रकार समोर आला. अकॅडमीच्या संस्थापकाकडूनच हा प्रकार करण्यात आला आहे. अत्याचारानंतर संशयित संस्थापकाच्या पत्नीनं सर्व अल्पवयीन मुलींना धमकीही दिली. त्यामुळे या प्रकरणी आता संस्थापक काशिनाथ नांगरेसह पत्नी मनीषा नांगरे या दोघांवर पोक्सो कायद्याअंतर्गत आष्टा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच काशिनाथ नांगरेला अटक करण्यात आली आहे.

70 वर्षीय महिलेवर अत्याचाराचा आरोप

अमरावतीच्या चांदूर बाजार तालुक्यात 70 वर्षीय वृद्ध महिलेवर अत्याचार केल्याचा धक्कादायक आरोप समोर आला आहे.. ४ सप्टेंबरच्या रात्री शेतात ही घटना घडल्याचे तक्रारीत नमूद आहे. सरमसपुरा पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

नाशिकमध्ये पुन्हा नवा भोंदूबाबा!

'11 लाखांच्या बदल्यात 15 कोटींचा पाऊस पाडतो', असलं विचित्र आमिष दाखवलं की...



बंगळुरू। गेल्या काही दिवसांपासून राज्यात भोंदू बाबांचे पेव फुटल्याची अनेक प्रकरणं समोर येत आहेत. नाशिकमध्येदेखील भोंदुबाबाचे एक धक्कादायक प्रकरण समोर आले आहे. पंधरा कोटी रुपयांच्या पैशांचा पाऊस पाडण्याचे आमिष दाखवणाऱ्या भोंदू बाबाला अटक करण्यात आले आहे. कळवण तालुक्यातील पिंपळे खुर्द येथे या भोंदू बाबावर कारवाई करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, या भोंदू बाबाने मुंबईतील काही कुटुंबांना मंत्र-तंत्र आणि पूजा विधीच्या नावाखाली फसवल्याचा आरोप आहे. या भोंदू बाबाने सुरुवातीला त्याने पंधरा कोटी रुपयांचा पैशांचा पाऊस पाडतो, असं म्हणत अमिष दाखवले. त्याने पीडित कुटुंबाला एक हजार रुपये घेऊन 2 लाख रुपये केल्याचा बनाव रचला.

भोंदू बाबाच्या या बनावाला भुलले. त्यानंतर त्यांने पूजा विधीदरम्यान नारळातून स्फोट करुन चमत्कार केल्याचे भासवले. पिडीतांचा त्याच्यावर विश्वास बसल्यानंतर त्याने पाच जणांकडून तब्बल 10 लाख 55 हजार रुपये दिले. तेव्हा या भोंदू बाबाने तीन कोटी रुपयांचा पैशांतचा पाऊस पाडल्याचे सांगत गोणी भरुन बनावट नोटा दिल्या. त्यानंतर गोणी सात दिवस न उघडण्याची पिडीतांना भीतीदेखील घआतली होती.

सात दिवसांनंतर जेव्हा पीडीत कुटुंबीयांनी गोण्या उघडल्या तेव्हा वरची नोट खरी होती तर बंडलमधील इतर नोटा बनावट असल्याच्या उघड झाले. जेव्हा पीडितांनी त्याच्याकडे पैसे परत मागितल्यानंतर पीडितांना गायब करण्याची आणि जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर पीडितांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीशी संपर्क साधला. अंनिसच्या मदतीने अभोणा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

भोंदू हिराचंद बर्डेसह सहा साथीदारांना पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. जादूटोणाविरोधी कायद्यासह भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांनुसार कारवाई करण्यात आली असून अशाच प्रकारे फसवणूक झालेल्यांनी अभोणा पोलिसांशी किंवा अंनिसच्या कार्यकर्त्यांशी संपर्क करण्याचे आवाहन केले आहे.

21 वर्षीय शिकाऊ डॉक्टर तरुणीनं उचललं टोकाचं पाऊल

पुणे। पुण्यातील कात्रज परिसरातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. 21 वर्षीय शिकाऊ डॉक्टर तरुणीचा इमारतीच्या नवव्या मजल्यावरून पडून मृत्यू झाला आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. माया रेड्डी असं मृत तरुणीचं नाव आहे. माया रेड्डी ही भारती विद्यापीठात एमबीबीएसच्या द्वितीय वर्षाला शिक्षण घेत होती, अशी माहिती समोर आली आहे. माया ही मूळची हैदराबाद येथील असल्याची माहितीही समोर आली आहे.

तिच्या शिक्षणासाठी ती पुण्यात राहत होती. दरम्यान, कात्रज परिसरातील एका सोसायटीमध्ये ती राहत होती. बुधवारी दुपारी साधारण एक वाजण्याच्या सुमारास माया रेड्डी हिने राहत्या इमारतीच्या नवव्या मजल्यावरून खाली उडी मारल्याची प्राथमिक माहिती आहे. या घटनेत ती गंभीर जखमी झाली. घटनेची माहिती मिळताच भारती विद्यापीठ पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करत पुढील तपास सुरू केला आहे.

माया रेड्डीने हे टोकाचं पाऊल नेमकं कोणत्या कारणातून उचललं, याचा तपास आता पोलिसांकडून केला जात आहे. अभ्यासाचा ताण होता का, अथवा यामागे अन्य काही कारण आहे का, हे तपासानंतरच स्पष्ट होणार आहे.

दरम्यान, या घटनेमुळे भारती विद्यापीठ परिसरातील विद्यार्थ्यांमध्येही हळहळ व्यक्त केली जात आहे. भारती विद्यापीठ पोलिसांकडून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

5 रुपयांची जुनी नोट, 51 लाखांचे स्वप्न अन् लाखोंचा गंडा

बंगळुरू। सोशल मीडियावर व्हायरल होणारी आकर्षक रील्स आणि प्रचंड नफ्याच्या दाव्यादरम्यान मुंबईत सायबर फसवणुकीचं एक मोठं प्रकरण उघडकीस आलं आहे. वरळीकत राहणाऱ्या एका व्यक्तीला 5 रुपयांच्या जुन्या नोटांच्या बदल्यात थेट 51 लाख रुपये मिळतील, असं आमिष दाखवण्यात आलं. तोही त्या आमिषाला भुलला आणि त्याच जाळ्यात अडकून त्याने लाखो रुपये गमावले. इन्स्टाग्रामवर दिसलेल्या एका जाहिरातीनंतर पीडित इसमाने आरोपींशी संपर्क साधला होता, त्यानंतर विविध शुल्क तसेच प्रोसेसिंग फीच्या नावाखाली त्याला पैसे जमा करण्यास सांगण्यात आलं. मात्र आपली फसवणूक झाल्याचं त्याला काही काळाने लक्षात आलं आणि तो हादरलाच 52 लाखांचं दाखवलं आमिष पीडित इसमाने 5 रुपयांच्या पाच जुन्या नोटांचे फोटो आरोपींना पाठवले. त्यानंतर कथित खरेदीदारांनी या नोटांच्या बदल्यात त्याला 51 लाख रुपये मिळू शकतात, असा दावा करत आमिष दाखवलं. त्याचा विश्वास संपादन करण्यासाठी



मुंबईत सायबर फसवणुकीचे मोठे प्रकरण उघडकीस आले आहे. एका व्यक्तीला जुन्या ५ रुपयांच्या नोटांच्या बदल्यात लाखो रुपये देण्याचे आमिष इंस्टाग्राम रीलद्वारे दाखवण्यात आले.

सुरुवातीला आरोपींनी एक क्यूआर कोड पाठवला आणि प्रोसेसिंग शुल्काच्या नावाखाली 11 हजार रुपये जमा करण्यास सांगितलं. ही रक्कम जमा झाल्यानंतर त्या आरोपींनी विविध औपचारिकता आणि शुल्क यांचं कारण देत वारंवार त्याच्याकडे पैशांची मागणी केली. एवढंच नव्हे तर मोठ्या नफ्याचं आमिष दाखवून आरोपींनी पीडित इसमाकडून अनेक वेळा पैसे घेतले. 4 जून ते 12 जून 2026 या कालावधीमध्ये आरोपींनी त्याला वेगवेगळ्या बँक अकाऊंट्समध्ये रक्कम ट्रान्स्फर करण्यास सांगितली. त्या काळात पीडित इसमाने एकूण 3 लाख 3 हजार 231 रुपये जमा केले होते. मात्र वारंवार पैसे भरूनही दावा करण्यात आलेले 51 लाख रुपये काही त्याला मिळले नाहीत आणि आपली फसवणूक झाल्याचे अखेर त्याच्या लक्षात आलं. पीडित इसमाने वरळी पोलीस ठाण्यात धाव घेत सर्व प्रकार सांगितला. त्याच्या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला. क्ळ ऊ३ कलम 66(उ), 66(ऊ) तसेच इटर कलम 318(4), 319(2) अंतर्गत गुन्हा अंतर्गत गुन्हा दाखल करत पोलिसांनी याप्रकरणाचा तपास सुरू केला आहे. आरोपींनी फसवणुकीसाठी जी बँक खाती वापरली आणि जो मोबाईल नंबर वापरण्यात आला, त्याची माहिती तपास यंत्रणा गोळा करत आहेत. इन्स्टाग्राम रीलमुळे सुरू झाला खेळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसारर, पीडित इसमान इन्स्टाग्रामवर एक रील पाहिलं होतं, 5 रुपयांच्या जुन्या नोटांच्या बदल्यात मोठी रक्कम मिळेल, असा दावा त्यात करण्यात आला होता.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com